**प्रेस नोट** **दिनांक ०५/०६/२०१९**

## वारजे माळवाडी पोलीस स्टेशन

## पोलीसांच्या प्रयत्नामुळे हरविलेला मोबाईल दिड महिन्या नंतर महिलेला परत

## पोलीस सर्व सामान्यांच्या मदती करीता तत्पर असल्याचा दिला दाखला

दिनांक १८/०४/१९ रोजी महिला नामे श्रीमती वर्षा मौर्य वय २५ वर्ष रा. १४१३ ज्ञानेश्वर मंगल कार्यालया जवळ, शुक्रवार पेठ, पुणे यांनी कर्वेनगर पोलीस चौकीत दिले तक्रारीत त्यांचा मोटो ई ५ प्लस मोबाईल फोन हॅन्ड सेट त्यांचे पर्स मध्ये ठेवला असताना वडाचा बस स्टॉप ते कर्वेनगर बस स्टॉप या बस प्रवासा दरम्यान कोठे तरी पडून गहाळ झाला आहे. वगैरे मजकूरची तक्रार दिल्याने वारजे माळवाडी पोलीस ठाणे प्रॉपर्टी मिसिंग रजि नं २७५/१९ दि १८/०४/१९ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली होती.

दाखल प्रॉपर्टी मिसिंगचे तक्रारीत पो.ना. बालारफि शेख व मॅगी जाधव यांनी मोबाईल मध्ये असलेले सिमकार्ड, आय.एम.ई.आय नंबर वरून सतत दिड महिना तांत्रिक विश्लेषण करून हरविलेल्या मोबाईल मध्ये कोणते सिमकार्ड वापरले जात आहे याची माहिती घेऊन त्या नंबरची सर्व माहिती मिळवून सदरचा हरविलेला मोबाईल फिर्यादी महिलेला सुस्थितीत परत मिळवून दिला आहे.

फिर्यादी महिला हया स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असून त्यांचा दिड महिन्यापूर्वी हरविलेला मोबाईल फोन हॅन्ड सेट सुस्थितीत परत मिळवून दिल्या बद्दल त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रकाश खांडेकर यांना व्हॉटस ॲप मेसेज व्दारे पो.ना. बालारफि शेख व मॅगी जाधव यांना धन्यवाद देऊन पोलीसांची जनमाणसांनी माझ्या मनात जी प्रतिमा निर्माण केली होती सदर घटनेने पोलीसांची ती प्रतिमा चुकीची असल्याचे माझे निदर्शनास आले आहे. पोलीस सर्वसामान्य लोकांच्या मदती करीता तत्पर असलेबाबत मला अनुभव आला असल्याचे नमूद केले आहे.